महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महापारेषण समाचार

वर्ष-१० अंक-३ एप्रिल - मे, २०१६

प्रिय कर्मचारी बंधु आणि भगीनींनो,

दिनांक ०६.०६.२००५ रोजी पुर्वाश्रमीच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे विभाजन होवून महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीची निर्मीती झाली. आपल्या सर्वांना कंपनीच्या वर्धापन दिनाच्या मनपुर्वक शुभेच्छा. कंपनीचा वर्धापन दिन चिरायु होवो ही सदिच्छा.

महापारेषण कंपनी निर्माण झाल्यानंतर विद्युत प्रणाली मधल्या तीन महत्वाच्या घटकांवर जसे निर्मीती, पारेषण व वितरण यंत्रणेवर स्वतंत्रपणे लक्ष केंद्रीत करण्यास आपल्याला यश आले. पारेषण प्रणाली सक्षम करण्यास अति-उच्च दाब वाहणाऱ्या वाहिनी तसेच विविध विद्युत क्षमतेचे उपकेंद्रे प्रस्थापीत करून आपली वीज वहन करण्याची क्षमता आपण शकलो व त्यामुळेच पारेषण प्रणाली ज्याला निर्मीती व वितरण प्रक्रीये मधला महत्वाचा दुवा (The Link) समजण्यात येते, त्याची जबाबदारी आपण चांगल्या प्रकारे पार पाडत आहोत.

वर्ष २००५ ते २०१६ पर्यंत आपण आपल्या पायाभूत सुविधा मध्ये वाढ केली व त्याचा तपशील खाली दिलेल्या तक्त्यानुसार आहे.

| वर्ष | वाहिनी | उपकेंद्रे | एमव्हीए क्षमता |
|---|---|---|---|
| २००५ | ३४६३० | ५६६ | ५४४८५ |
| २००६ | ३५०२७ | ४३८ | ५५७५९ |
| २००७ | ३५६२६ | ४८६ | ५७७१३ |
| २००८ | ३६२८६ | ४९८ | ६१५३० |
| २००९ | ३६७१६ | ५१५ | ६६११८ |
| २०१० | ३७१३३ | ५२० | ७३७९१ |
| २०११ | ३८०६८ | ५३६ | ८२६२० |
| २०१२ | ३९८७१ | ५५९ | ८९१७९ |
| २०१३ | ४१३९० | ५८४ | ९८७१७ |
| २०१४ | ४२५७८ | ६०८ | १०३६०३ |
| २०१५ | ४१५९१ | ६०९ | १०५११२ |
| २०१६ | ४३७३० | ६३३ | ११०८१४ |

एवढ्या मोठ्या प्रमाणात वाढ कंपनी करणानंतर पारेषण यंत्रणेवर स्वतंत्रपणे लक्ष केंद्रीत करण्यात आल्यामुळे झाली आहे.

विजेची भावी गरज पाहता आपल्या समोर आज अनेक आव्हानांना सामोरे जायचे आहे. प्रस्थापीत केलेली पारेषण यंत्रणा अद्ययावत ठेवण्याकरीता तीची उचित देखभाल, संचलन व सुव्यवस्था, पारेषण प्रकल्प ठरलेल्या कालावधीत पूर्ण करणे तसेच हे करत असतांना ग्राहकांना वीज रास्त दरात उपलब्ध होईल या करीता कमीत कमी खर्चात व गुणवत्ता अबाधीत ठेवून काम करणे गरजेचे आहे.

त्याकरीता उत्तम प्रकारे नियोजन व आढावा घेतला पाहिजे. उचित नियोजनामुळे आपण आपली कामगिरी उत्तम प्रकारे बजावू शकतो. नियोजन व आढावा प्रशासनाचा महत्वाचा घटक ठरतो. त्यामुळे आपल्याला आपली दिशा ठरवता येते. आपण मागे राहिलो असल्यास त्यावर अधिक संसाधने देवून त्या घटकाला पूर्वपथावर आणण्यास मदत होते.

आज अनेक विषयांमध्ये आपण चांगली कामगिरी केली असली, तरीही असे अनेक विषय आहेत ज्यामध्ये सुधार व काळानुरूप बदल होणे गरजेचे वाटते. हे विषय /घटक चर्चा करून ओळखता आले पाहिजे व त्यावर कृती आराखड्याचे वेळापत्रक तयार करून त्याचा विकास करता आला पाहिजे. आज आपण हेच ध्येय हाती बाळगून कार्य करीत आहेत. संचलन व सुव्यवस्था, प्रकल्प, वित्त व लेखा, मानव संसाधन, भार प्रेषण केंद्र, इआरपी/आयटी, केंद्रीय भांडार खरेदी अशा विभागांच्या अनेक विषयांवर विश्लेषण करून त्यातील प्रत्येक विषयाची पोकळी व विकासाची गरज ओळखून त्यावर कालबद्ध कृती करत आहेत. ही पद्धत सतत अवलंबली पाहिजे. त्यामुळे आपल्या अंतर्गत सुधारणा अखंडीतपणे सुरू ठेवण्यास मदत होते.



राजीव कुमार मित्तल
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

आपल्या जोखमीच्या कार्यामुळे अपघात होण्याची शक्यता असते, मात्र त्याकरीता आपण अनेक मार्गदर्शक सुचना जारी केल्या आहेत. मात्र त्याच्या अंमलबजावणीत त्रुटी राहिल्या तर अपघात घडलेले आहेत. हे आपण अपघातांच्या कारणांचे विश्लेषण केले असता आपण पाहतो. एक आदर्श व अपघात शुन्य धोरण मला आपल्या कंपनीमध्ये राबवायचे आहे व त्याकरीता आपण सर्व कटीबद्ध होवूया.

सर्व विभाग प्रमुख व वरिष्ठ अधिकारी यांनी आपल्या विस्तृत कार्यक्षेत्रात भेटी देवून, परिक्षण करणे, आढावा घेणे हा त्यांच्या कामाचा भाग आहे. त्याकरीता त्यांना विविध संसाधने देण्यात आलेली आहेत. आपल्या कार्यक्षेत्रात वेळापत्रकानुसार भेट देवून त्या गटाला मार्गदर्शन करणे व त्यांचे मनोबल वाढवणे अत्यंत गरजेचे असते.

कार्य स्वत:च एक प्रशिक्षण असते. मात्र विशेष ज्ञाना करीता व कौशल्या करीता प्रशिक्षण मदत करते. कंपनीतील वेतनगट १ व २ अधिकाऱ्यांसाठी अग्रगण्य तांत्रिकी व व्यवस्थापकीय प्रशिक्षणाचे नियोजन करण्यात (वर्ष २०१६-२०१७) आलेले आहे, तसेच वेतनगट ३ व ४ करीता आपल्या प्रादेशिक प्रशिक्षण केंद्रातच अनेक प्रशिक्षण कार्यक्रमांचे (वर्ष २०१६-२०१७) नियोजन करण्यात आलेले आहे. मला आशा आहे की आपण सर्व दिलेल्या संधीचा उपयोग करून आपला गुणात्मक विकास करण्यास मदत कराल.

विद्युत क्षेत्रातील अनेक बदलांना सामोरे जाण्याकरीता ह्या बदलांचा आगाऊ अभ्यास करून त्यानुरूप सकारात्मक बदल आपल्याला आपल्यातंर्गत प्रणालीमध्ये करता आले तर हे बदल आपल्याला फलदायी ठरू शकतात.

वर्ष २०१६-२०१७ चे कामगिरीचे लक्ष आपण सर्व उत्तम प्रकारे पूर्ण करून आपल्या विकासाची वाटचाल पुढे चालू ठेवाल असा मला विश्वास आहे.

**शुभेच्छां सह !**

**राजीव कुमार मित्तल**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी तर्फे कंत्राटदारांचे एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन

दिनांक: ०९जुन, २०१६ महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादीत तर्फे हॉटेल ट्रायडंट, बीकेसी, मुंबई येथे महापारेषण साठी विविध स्तरावर सेवा पुरविणाऱ्या कंत्राटदार यांच्यासाठी एक दिवसीय सभेचे आयोजन मा. मंत्री महोदय, उर्जा, नवीन व नवकरणीय उर्जा, महाराष्ट्र राज्य श्री. चंद्रशेखरजी बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले होते.




सदर कार्यशाळेचे उद्घाटन मा. मंत्री महोदय, उर्जा, नवीन व नवकरणीय उर्जा, महाराष्ट्र राज्य, सन्मानीय श्री. चंद्रशेखरजी बावनकुळे व कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. राजीव कुमार मित्तल (भाप्रसे), मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महापारेषण यांच्या शुभ हस्ते करण्यात आले.

सदर कार्यक्रमाची सुरवात श्री. रविंद्र चव्हाण, संचालक प्रकल्प, पारेषण यांच्या भाषणाने झाली. त्यांनी त्यांच्या भाषणातून वीज क्षेत्रातील आव्हाने, बदल, संधी व सेवा पुरविणाऱ्या कंपनी व महापारेषण यांच्या भूमिका व जबाबदारींचे आकलन करून दिले. तद्नंतर मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महापारेषण, श्री. राजीव कुमार मित्तल (भाप्रसे) यांनी कार्यशाळेच्या आयोजनाचे उद्दीष्ट स्पष्ट केले. महापारेषण कंपनीची कामगिरी पाहता महापारेषणचा वाढता आवाका पाहता सेवापुरवठादार हे फक्त पुरवठादार नसून ते कंपनीचे भागीदार आहेत आणि भागीदारी ही अल्पकाळासाठी नसून ती दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे. कंपनीच्या विकासासाठी चांगल्या सेवा पुरवठादारांची कंपनीस आवश्यकता आहे. भविष्यातील वीजेची मागणी लक्षात घेता वीज उत्पादन व वितरण यांच्यातील महत्वाचा दूवा म्हणून काम करतांना आपल्या क्षमतेमध्ये सतत वाढ करावयाची असल्याने कंपनी नवनवीन प्रकल्प हाती घेत असते, याबरोबरच प्रकल्पाच्या वाढत्या किंमती, प्रकल्प पुर्ण करण्याचा कालावधी वाढत असल्याने प्रकल्पाच्या खर्चात वाढ होत असते हे टाळण्यासाठी कंपनीची भूमिका व जबाबदारी याबाबत मार्गदर्शन केले. महापारेषण कंपनीस कशाप्रकारे सुरक्षित व सक्षम करता येईल, कंपनीच्या प्रकल्प व संचलन व सुव्यवस्था यावर होणाऱ्या खर्चात कपात करून प्रकल्पांना गती देता येईल याबाबतचे विचार मांडतांनाच कंपनीचे पुर्णत: आधुनिकीकरण व स्वंयसंचालन करण्याचा मनोदय मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महापारेषण यांनी व्यक्त केला.

कार्यशाळे दरम्यान कंपनी व सेवा पुरवठादार यांच्या कडून आपल्या समस्या, विचार व सुचना यांचे सादरीकरणाच्या माध्यमातून आदान—प्रदान करण्यात आले. या बरोबरच मा. मंत्री महोदय यांच्या हस्ते सेवा पुरवठादारांसाठी त्यांना कंपनी बरोबर काम करतांनाचा अनुभव हा प्रतिसाद स्वरूपात आदान—प्रदान करता यावा याकरीता महापारेषणच्या संकेतस्थळावर प्रतिसाद पुरविण्याबाबतच्या लिंकचे अनावरण करण्यात आले.

कार्यशाळेच्या उत्तरीय भागात मा. मंत्री, उर्जा, नवीन व नवकरणीय उर्जा, महाराष्ट्र राज्य श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. मा. मंत्री महोदय यांनी उपस्थितांच्या समस्या व सुचनांचे स्वागत करतांना उर्जा मंत्री म्हणून तुमच्या सुचना व समस्याचे निराकरण करण्याच्या दृष्टीने फक्त महापारेषण स्तरावरच नाही तर महानिर्मीती व महावितरण स्तरावर देखील त्वरीत सुचना देवून त्या सोडविण्याचे आश्वासन दिले. शासन स्तरावर ही उर्जा क्षेत्राच्या विकासास अनुकुल शासन निर्णय घेतांना विकासात्मक कार्यात कुठलाही अडथळा निर्माण होणार नाही. सेवा पुरवठादार यांनी केलेल्या कामाचे देयक त्यांना वेळेत मिळावीत यासाठी ऑनलाईन पद्धतीने देयके पारीत करण्यात यावे अशी सुचना संबंधीत अधिकारी यांना केली. उर्जा विभागाचा आढावा मांडतानाच त्यांनी भविष्यातील वाटचाली बद्दलचा आराखडा मांडला. मार्गदर्शनाच्या शेवटी राज्यातील जनतेच्या विकासाठी कंपनी व सेवा पुरवठादार यांची भागीदारी गरजेची असून सर्वांचे अच्छे दिन येतील याबाबत आश्वस्त केले.

ह्या प्रसंगी महापारेषण संबंधीत देशभरातील जवळपास ७० विविध सेवा पुरवठादारांच्या २०० प्रतिनिधीनी कार्यशाळेत सहभाग नोंदवला याबरोबरच महापारेषणचे सांघिक कार्यालयातील वरिष्ट अधिकारी ही याप्रसंगी उपस्थित होते. कार्यशाळेचा समारोप मा. संचालक प्रकल्प, महापारेषण, श्री. रविंद्र चव्हाण यांच्या समारोपीय भाषणाने झाली. त्यांनी पुन्हा एकदा दोन्ही बाजूच्या भूमिका व जबाबदारींचे पुर्णविलोकन करून, महापारेषण कंपनीस चांगल्या सेवा पुरवठा करणाऱ्या कंपनींचे महापारेषणमध्ये स्वागत आहे व त्यांना महापारेषण कडून सर्वतोपरी सहकार्य करण्याबाबत आश्वस्त केले.

## कराड परिमंडळ कार्यालयात मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, श्री. राजीव कुमार मित्तल यांची आढावा बैठक संपन्न

दिनांक १६ एप्रिल, २०१६ रोजी सकाळी १०.०० वाजता कराड परिमंडळ कार्यालयात मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, श्री. राजीव कुमार मित्तल यांची कराड परिमंडळांतर्गत सातारा व सांगली जिल्ह्याच्या कामासंदर्भात आढावा बैठक संपन्न झाली. तसेच दिनांक १८ एप्रिल, २०१६ पोफळी येथे कोल्हापूर, रत्नागिरी व सिंधुदूर्ग या तीन जिल्ह्यातील कामासंदर्भात आढावा बैठक घेवून जनरेशन स्टेज १,२ ३ व ४ ला भेट देवून हायड्रो प्रोजेक्ट पाहणी केली.



श्री. वाय.जी. गजभिये, मुख्य अभियंता, अउदा बांधकाम नि संवसु परिमंडळ, कराड यांनी मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महापारेषण, श्री. राजीव कुमार मित्तल यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. सदर बैठकीमध्ये मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी कराड परिमंडळ कार्यालयाच्या अधिकारक्षेत्रात येणाऱ्या उपविभाग / उपकेंद्रातील वाहिनीच्या कामाचा आढावा घेतला. तसेच मा.सं. व विवले विभागातील कामांचा देखील आढावा घेतला. सदर बैठकीमध्ये मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांना कंपनीच्या कामाबद्दल त्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

## मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, यांची औरंगाबाद परिमंडळातील नांदेड व लातूर विभागास भेट

श्री. राजीव कुमार मित्तल, मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित, यांनी दिनांक २८.०४.२०१६ रोजी औरंगाबाद परिमंडळातील नांदेड व लातूर विभागातील अधिकाऱ्यांसोबत विभागांतर्गत सुरू असलेल्या कामाची आढावा बैठक घेतली. नांदेड व लातूर विभाग हे औरंगाबाद परिमंडळातील महत्वाचे विभाग असल्याने सदर विभागांतर्गत चालू असलेल्या व पूर्ण झालेल्या प्रकल्पांबाबत मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी माहिती घेतली.




महापारेषणच्या औरंगाबाद परिमंडळातील, परळी मंडळाच्या अखत्यारितील नांदेड, उस्मानाबाद, लातूर आणि बीड या जिल्ह्यातील महापारेषणच्या संचालन व सुव्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महापारेषण मुंबई यांनी दि. २८.०४.२०१६ रोजी नांदेड आणि दि. २९.०४.२०१६ रोजी परळी येथे बैठकी घेतल्या. मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी या बैठकीमध्ये चारही जिल्ह्यातील कार्यरत उपकेंद्रे, रोहित्र क्षमता, वाहिन्या तसेच प्रस्तावित उपकेंद्रे, अतिरीक्त रोहित्र व नवीन वाहिन्या याबाबत परिमंडळातील अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली आणि मार्गदर्शन केले. या चारही जिल्ह्यातील कमी दाबाची समस्या निवारणासाठी उपाय योजनेबद्दल चर्चा झाली.

मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक या दरम्यान ४०० के. व्ही. उपकेंद्र कुंभारगाव, २२० के. व्ही. उपकेंद्र भोकर, २२० के. व्ही. उपकेंद्र कृष्णूर या ठिकाणी भेटी देवून पाहणी केली. तसेच ४०० के. व्ही. उपकेंद्र, गिरवली येथे पाहणी करून सुचना केल्या.

या वेळी औरंगाबाद परिमंडळाचे मुख्य अभियंता, श्री. गणपत मुंडे. अधीक्षक अभियंते सर्वश्री शशांक जेवळीकर, शिवशंकर स्वामी, अनिल भारसाखळे तसेच परिमंडळातील सहाय्यक महाव्यवस्थापक (मा. सं), नितीन कांबळे, सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले), प्रविण यशवंते आणि संबंधीत विभागातील सर्व कार्यकारी अभियंते उपस्थित होते.

## प्रकाशगंगा सांघिक कार्यालय येथील महाराष्ट्र दिनाची क्षणचित्रे



मानवंदना देताना मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक



ध्वजारोहण प्रसंगी उपस्थित वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी

## जत तालुक्यातील क्षतिग्रस्त मनोऱ्याचे काम युद्धपातळीवर पूर्ण

दिनांक १८.५.२०१६ रोजी जत तालुक्याला बसलेल्या वादळी तडाख्यामुळे ११० के. व्ही. जत-सांखा वाहिनीचा वळसंग येथे असलेल्या विद्युत मनोरा क्र. ४४ जमीनदोस्त झाला होता. सदर मनोऱ्यांचे दुरूस्तीचे काम महापारेषण कंपनीकडून कर्मचारी व अधिकारी यांनी युद्ध पातळीवर पूर्ण करूण जत तालुक्याचा विद्युत पुरवठा वेळेपुर्वीच सुरळीत करण्यात आला. महापारेषण कंपनीतील अधिकारी व कर्मचारी वर्गाने सदर



क्षतिग्रस्त मनोऱ्याची पुर्नबांधणी करतांना अधिकारी व कर्मचारी



क्षतिग्रस्त मनोऱ्याची पुर्नबांधणी पुर्ण झाल्यानंतर अधिकारी व कर्मचारी चमू

मनोऱ्यांचे काम करतांना सर्व मार्गदर्शक सुरक्षा विषयक नियमांचे परिपूर्ण पालन करून सदरील मनोरा दुरूस्तीचे काम युद्धपातळीवर व विद्युत गतिने पूर्ण करून महापारेषण आणि संचलन व सुव्यवस्था विभागात एक प्रकारे मानक प्रस्थापित केले आहे. कंपनीकडून कर्मचारी व अधिकारी यांनी युद्धपातळीवर क्षतिग्रस्त मनोरा दुरूस्तीचे काम करून जत तालुक्याचा विद्युत पुरवठा पुर्ववत केल्याबद्दल जत परिसरातील लोकांकडून महापारेषणच्या अधिकारी व कर्मचारी यांचे कौतुक होत आहे.

## महापारेषणच्या विविध परिमंडळ कार्यालयातंर्गत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीची क्षणचित्रे

### सांघिक कार्यालय, मुंबई







### कराड परिमंडळ, कराड







### अमरावती परिमंडळ, अमरावती








### नागपूर परिमंडळ, नागपूर





# वीज मंडळातील संवातिवृत्त कर्मचाऱ्यांचे चौथे स्नेहसंम्मेलन

१ मे जागतिक कामगार दिन व महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून वीजमंडळ/ वितरण, पारेषण, निर्मिती कंपनीतील सेवानिवृत्त अभियंते, अधिकारी, कामगार कर्मचाऱ्यांचे चौथे स्नेहसंमेलन दि. ०१/०५/२०१६ रोजी महालक्ष्मी मल्टीपर्पज सांस्कृतिक हॉल, कोल्हापूर येथे श्री. वसंत भाऊ शिरोळे, लाईन फोरमन यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख वक्ते मा. श्री. विजय दादा आवटी (जयसिंगपूर) राष्ट्रपती पदक पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक यांचे उपस्थितीत संपन्न झाले.



श्री. अे. एन. कुलकर्णी, सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता यांनी मागील तीन स्नेह संमेलनाचा आढावा घेऊन वीज मंडळातील गत आठवणींना उजाळा देता यावा. तसेच ७५ वर्ष पूर्ण केलेल्या सहकाऱ्यांच्या कार्याचा गौरव करणेकरीता स्नेहसंमेलन आयोजित करणेत आलेचे प्रस्तावणेत प्रतिपादन करून उपस्थिताचे करवीर नगरीत स्वागत केले. याप्रसंगी संमेलनाचे अध्यक्ष श्री. वसंत शिरोळे व प्रमुख व्याख्याते श्री. विजय आवटी सर, राष्ट्रपती पदक पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक यांचे हस्ते शाल व गुलाबपुष्प देऊन वयाची ''अमृत महोत्सव'' पूर्ण केलेल्या पी. आर. शिरोडकर, मुख्य अभियंता, मुंबई, आण्णाजी रामचंद्र कुलकर्णी, कार्यकारी अभियंता, रमेश सदाशिव कुलकर्णी, उपकार्यकारी अभियंता, पुणे, वसंत हणमंत जांभळी, उपकार्यकारी अभियंता, सांगली माधव पांडूरंग भिडे, विभागीय लेखापाल, जयसिंगपूर, शशिकांत बाळकृष्ण नागवेकर, विभागीय लेखापाल, रत्नागिरी, नारायण शंकरराव पाटील, आस्थापना अधीक्षक, हरी दत्तात्रय कुलकर्णी, पर्यवेक्षक, वसंत गोपाळ अंगापूरकर, मीटर इन्स्पेक्टर, रघुनाथ विष्णु कुलकर्णी, आदीनाथ भाऊ माणगांवे, रावसाहेब महादेव कांबळे, दिनकर जिंदू कांबळे, लाईनमन, नामदेव पांडुरंग इंगवले, प्रभाकर नारायण गुळवणी, वरीष्ठ यंत्रचालक, दत्तात्रय शंकर हिरवे, उच्चस्तर लिपिक, आप्पासाहेब लक्ष्मण माणगांवे, शामराव भाऊसाहेब पाटील, निवृत्ती शिवराम लोळगे, अब्दुलरजाक कासिम शिडवणकर, लाईन फोरमन, तुकाराम कृष्णाजी राजीगरे, वाहनचालक यांचा भावपूर्ण सत्कार करण्यात आला.व्याख्यानकेसरी, मा. श्री. विजय दादा आवटी (जयसिंगपूर) राष्ट्रपती पदक पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक यांनी ''आनंदी जीवन जगावे कसे'' या विषयावर दैनंदिन जीवनात घडणाऱ्या लहान मोठया प्रसंगातून कशाप्रकारे आनंद घेता येतो व इतरांना देता येतो. याचे मार्मिकरित्या ओघवत्या शैलीमध्ये विश्लेषण करून उपस्थितांना हसून पुरेवाट केले. त्यांच्या कार्याची व लेखन वाङ:मयाची ओळख श्री. एस. डी. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता यांनी करून दिली. वीजमंडळातील २१० सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी सहभोजन घेतले. श्री. चंचल देशपांडे प्रस्तुत ''रोशन तुम्हीसे दुनिया'' निर्मित ''गीत गाता चल'' जुन्या—नव्या हिंदी/मराठी गाण्यांचा बहारदार कार्यक्रम झाला. त्यामध्ये वीज मंडळातील हौशी कलाकार श्री. अरूण बेळगांवकर व इतरांनी जुनी गाणी गाऊन कार्यक्रमाची शोभा वाढविली. नदाफ, सेवानिवृत्त वाहन चालक यांनी मराठी शाळेतील कविता म्हटल्या. यामध्ये 'वाटते सोनूली मंद झुळुक मी व्हावे' व 'शर आला तो धाऊनी आला काळ'. या कवितेने उपस्थितांना पन्नास वर्षापूर्वीचा काळ आठवला. उपस्थितांनी दाद तर दिलीच, पण ६५ व्या वर्षीपण मराठी शाळेतील कविता अजूनही तोंडपाठ असलेचे पाहून आश्चर्य व्यक्त केले.

श्री. सुरेश चौगुले, यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व श्री. शिरिष देशपांडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. नंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

श्री. व्ही. बी. सपाटे, बा. ना. कुंजिरे, शामराव लोहार, पुंडलिक साखळकर, दिलीप माळी, बी. जी. पाटील, मल्लेश रामपूर, जी. पी. भिऊंगडे, एल. डी. धनवडे, नयन माने, संभाजी मजगांवकर, बबन राशिंगकर, डी. डी. पाटील, शरद कांबळे यांनी सदरचा कार्यक्रम यशस्वी करण्यात मोलाचे सहकार्य केले.

## ४१ व्या अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या विविध स्पर्धांमध्ये पारेषण खेळाडूंचे सुयश




४१ व्या अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या वतीने आंध्रप्रदेश विद्युत मंडळ क्रीडा कौन्सिल यांनी आरकुव्हॅली, विशाखापट्नम येथे राज्य स्तरावर (आंतर राज्य विद्युत मंडळ) महिलांसाठी टेबल-टेनिस बॅडमिंटन, कॅरम, चेस व पुरुषांसाठी ब्रीज स्पर्धांचे आयोजन केले होते. सदरहू स्पर्धेत महापारेषण कंपनीच्या महिला टेबल-टेनिस संघाने टीम इव्हेन्ट मध्ये "कास्य पदक" पटकाविले.

"कास्य पदक" पटकाविणारा महिलांचा संघ १) गार्गी देशपांडे - मुख्य कार्यालय, मुंबई २) पुनम घुले - अमरावती झोन ३) मेघा देशमुख - औरंगाबाद झोन, तसेच सौ.सुवर्णा रामतिर्थीकर, अमरावती झोन यांनी बॅडमिंटन (सिंगलओपन)मध्ये उपउपांत्य फेरी पर्यंत मजल मारली. त्यांनी देखील खेळाचे उत्तम प्रदर्शन केले.

वरील पाच ही संघाचे संघव्यवस्थापक ही जबाबदारी श्री.प्रविण पाटील, क्रीडा सहाय्यक, मुख्य कार्यालय यांनी यशस्वी रित्या पार पाडली. तसेच टेबल-टेनिस संघास त्यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले महापारेषणच्या सर्व अधिकारी व कर्मचारी वर्गाकडून यशस्वी खेळाडूंचे " हार्दिक अभिनंदन "

## श्री. ज्ञानेश्वर गित्ते यांची दिवाणी न्यायाधिश पदी निवड



अतिउच्चदाब संवसु विभाग नांदेड अंतर्गत अउदा संवसु उपविभाग वाघाळा येथे "वाहन चालक" या पदावर कार्यरत असलेले श्री. एम.जी. गित्ते यांचा पाल्य श्री. ज्ञानेश्वर मधुकर गित्ते महाराष्ट्र आयोगामार्फत घेण्यात आलेल्या दिवाणी न्यायाधिश (कनिष्ठस्तर) व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग सरळ सेवा भरती अंतर्गत स्पर्धा परिक्षा २०१५ उत्तीर्ण झाला असून त्यांची निवड दिवाणी न्यायाधिश (कनिष्ठ स्तर) व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग या पदासाठी झाली आहे.

श्री. ज्ञानेश्वर मधुकर गित्ते यांची दिवाणी न्यायाधिश (कनिष्ठस्तर) व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग म्हणून निवड झाल्याबद्दल अउदा संवसु विभाग नांदेडचे कार्यकारी अभियंता श्री. डि. एस. शेंदुरवारकर, अति,कार्यकारी अभियंता, श्री. मो. हनिफ मो. इस्माईल, श्री. ए. ए. खान, उपव्यवस्थापक (मासं), श्री. एच. वाय. अडबलवार, उपव्यवस्थापक (विवले), श्री. एस. डी. पेरके आदीनी अभिनंदन केले आहे. श्री. ज्ञानेश्वर गित्ते यांच्या यशाबद्दल त्यांचे महापारेषण परिवारा तर्फे हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा




४१ व्या अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या वतीने हरियाणा पॉवर स्पोर्टस् ग्रुपने पंचकुला (चंडीगढ) येथे "कुस्तीच्या स्पर्धा" आयोजित केल्या होत्या. या स्पर्धेमध्ये महापारेषणच्या श्री.वाय.एस.बीडगर, औरंगाबाद झोन यांनी ५८ किलो वजनगट कुस्तीमध्ये "रौय पदक" (**Silver Medal**) पटकाविले, तसेच श्री .डी. वाय. भानुसे, वाशी झोन यांनी ५८ किलो वजनगट कुस्तीमध्ये "कास्य पदक"(**Bronze Medal**) पटकाविले. या संघाचे संघव्यवस्थापक ही जबाबदारी श्री. डी. एम.कदम, मुख्य कार्यालय (रोकड विभाग) यांनी उत्तमप्रकारे पार पाडली.

## कु .प्रांजल वराडे हिचे दैदीप्यमान तिहेरी यश



कु. प्रांजल ने "Mimamsa-2016" Annual Science Quize मध्ये प्रथम क्रमांक मिळविला. तसेच कु. प्रांजल हिने ''मिन्स'',बेलारूस येथ आयोजित (EGMO 2015) या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व केले व कास्यपदक मिळविले. तिच्या या यशाबद्दल माननिय मुख्यमंत्री, श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. चियांग मै, थायलैंड येथे झालेल्या (IMO-2015) या स्पर्धेत सुध्दा भारताचे प्रतिनिधित्व केले व भारतासाठी कास्यपदकाची कमाई केली.

कु. प्रांजल च्या उपलब्धतेमुळे HBCSE(Homi Bhabha Centre For Science Education, Mumbai) या संस्थेतर्फे आयोजीत आगामी IMOTC-2016 (International Mathematical Olympiad Training Camp) या ट्रेनिंग कॅम्पसाठी एप्रिल १८ ते मे १६, २०१६ या कालावधीत तिची "Training Faculty" म्हणून निवड करण्यात आली आहे.

कु. प्रांजल चे वडील श्री. पांडूरंग तोताराम वराडे हे अतिरिक्त कार्यकारी अभियंता या पदावर, भार प्रेषण केंद्र, अंबाझरी नागपूर (महापारेषण) येथे कार्यरत आहेत.

महापारेषण समाचारसाठी बातमी पाठवताना ती कृपया मोजक्या व समर्पक शब्दांत व छायाचित्रासह

prohr@mahatransco.in

या ई-मेलवर पाठवावी ही विनंती

## FROM THE DESK OF ED (HR)

### वेदनेतुन संवदेना आणि संवेदनेतुन शिक्षण

प्रतिकुल परिस्थितीत आपल्याला अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. परिवस्थितीशी झगडतांना चांगले व वाईट अनुभव येतात. वाईट अनुभवातुन आपल्याला धडा मिळत असतो व त्याकरीताच वेदनेतुन संवेदना आणि संवेदनेतुन शिक्षण असे म्हटले जाते.

वेदना फक्त शारिरीकच नसतात. आपल्या मनाला सुध्दा वेदना पोहचत असतात करीता जीवनात आसक्ती बाळगु नये. कारण त्याची पूर्तता झाली नाही तर त्या वेदना देवून जातात, आकस्ती वाजवी व आवाजवी असे वर्गीकरण करणे सुध्दा चुकीचे ठरते.

कार्य करत राहणे फळाची अपेक्षा न करता असे भगवत गीतेत आपल्याला सांगितले आहे. आपण फळ ठरवून कार्य करत राहतो व त्यामुळे फळासंदर्भात एक राक्षसी महत्वाकांक्षा आपल्या मनात तयार होत जाते. फळाची पूर्तता न झाल्यास आपण त्रासतो व त्यांचे वाईट परिणाम आपल्या मनावर व शरीरावर होत असतात.

संतोषीवृत्ती आपल्या मनावर नियंत्रण ठेवण्यास मदत करते, ही वृत्ती आपल्याला विकसीत करता येवू शकते. आहार, विहार व व्यायाम जीवनात अत्यंत महत्वाच्या गोष्टी आहेत. सात्वीक आहाराने मन व शरीर सात्वीक राहण्यास मदत होते. चांगल्या माणसाच्या सोबतीत चांगला विहार लाभतो तसेच नियमित व्यायाम आपल्याला आरोग्यदायी बनवितो.

चांगल्या मनाने व विचाराने कार्य हाती घेतल्यास त्यापासून आपल्याला समाधान मिळते. त्याचा तणाव वाटत नाही.

शुभेच्छांसह!

### महापारेषणच्या सांघिक कार्यालयासह राज्यातील सर्व परिमंडळात श्री. महात्मा बसवेश्वर जयंती साजरी



दि. १३.०५.२०१५ रोजी महापारेषणच्या प्रकाशगंगा, या सांघिक कार्यालयात जग्तज्योती श्री. महात्मा बसवेश्वर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. ओ. के. एम्पाल, संचालक(संचलन) हे होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगत्ज्योती श्री. महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस माल्यार्पण व दीप प्रज्वलित करून झाली. यानंतर उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचारी वर्गाने जगत्ज्योती श्री. महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस पुष्पार्पण करून वंदन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालक यांनी आपल्या प्रास्ताविकातून जगत्ज्योती श्री. महात्मा बसवेश्वर यांच्या जीवन कार्याचे व त्यांच्या सामाजिक कार्याची माहिती उपस्थितांसमोर मांडली. जगत्ज्योती श्री. महात्मा बसवेश्वर यांचा सर्वधर्म समभाव याबरोबरच स्त्री समानतेची शिकवण देणारे ते आद्य समाजसुधारक व संत महात्मा होते. अशी माहिती कार्यक्रम सुत्रसंचालकाने करून दिली.

महापारेषणच्या महाराष्ट्रातील विविध परिमंडळांतर्गत जग्तज्योती श्री. महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी करण्यात आली.

महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती/निवृत्ती माहे एप्रिल ते मे-२०१६

**नियुक्ती-**

| अ.क्र. | नाव | पद | पद स्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| | निरंक | - | - | - |

**निवृत्ती-**

| अ.क्र. | नाव | पद | पद स्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| | निरंक | - | - | - |

संपादक :जनसंपर्क अधिकारी, महापारेषण
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता: संपादक, महापारेषण समाचार,
७ वा माळा, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित,
प्लॉट नं. सी-१९, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई-४०००५१
(खाजगी वितरणासाठी)

**Printed & Published By: The Public Relations Officer, MSETCL**

Published at:7th Floor, Prakashganga,Plot No. C-19, E-Block, Bandra-Kurla Complex, Mumbai-400051

The Company accepts no responsibility for matter published in the journal